## ६) नागरी संस्था/नागरी बँका कर्जे-

### १)नागरी सहकारी बँकांना करावयाच्या कर्जपुरवठ्यासंबंधीचे धोरण :-

**कर्जपुरवठा धोरण :-**

| अ. नं. | कर्जाचा प्रकार | दुरावा टक्के | जिल्हा बँक शेअर्स धारणा | व्याजदर टक्के | धोरण |
|---|---|---|---|---|---|
| **अ** | **अर्बन बँका फेर नजरगहाण कर्जे -** | | | | |
| १ | सोनेगहाण / सोने तारण कर्जावर फेरनजरगहाण कर्जमर्यादा | २५.०० | -- | १२.५० | नागरी बँकेने ठरविलेले तारण असलेल्या सोन्याचे किंमतीचे ७५टक्के एवढा कर्ज पुरवठा सभासदांना करणेचा असून अशा केलेल्या कर्जपुरवठ्याचे विनाथकीत येणेबाकीच्या ७५ टक्के कर्ज जिल्हा बँकेकडून मंजूर केले जाईल. नागरी बँकेने सोन्याच्या पूर्ण किंमतीची बँक इंडिम्निटी इन्शुरन्स पॉलिसी घेवून ती जिल्हा बँकेस बेचन करुन दिली पाहिजे. |
| २ | हळदमाल ताबेगहाण कर्जावर फेर नजरगहाण कर्जमर्यादा | २०.०० | ०.५ टक्का | १२.५० | नागरी बँकेने सभासदांना हळद मालाचे खरेदी अगर बाजारभाव यांत कमी असेल त्या किंमतीचे ६० टक्के एवढा कर्जपुरवठा करणेचा असून, अशा केलेल्या कर्जपुरवठ्याचे कर्जापोटी तारण असलेल्या हळद मालाच्या किंमतीचे ५० टक्के अगर नागरी सह. बँकेने दिलेल्या विनाथकीत कर्जाचे ८० टक्के यांत जी कमी असेल त्या रक्कमेपर्यंत कर्ज उचल दिली जाईल. दोन वर्षापूर्वीची हळद फेरतारण नजरगहाण कर्जापोटी स्विकारली जाणार नाही. ताबेगहाण मालाचा पूर्ण रक्कमेचा आगीचा व चोरीचा विमा उतरविणे असणे आवश्यक आहे. |
| ३ | लघुउद्योजकांना दिलेल्या कर्जावर फेर नजरगहाण कर्जमर्यादा | ५०.०० | २.०० | १३.५० | लघुउद्योजकांना पुरविलेल्या कर्जापोटी (मशिनरी व खेळते भांडवल)फेर कर्जमर्यादा मंजूर करणेत येईल. अशा कर्जाच्या विनाथकीत येणेबाकीच्या ५० टक्के रक्कम उचल दिली जाईल.याबाबत आवश्यक विमा व इतर तपशिलवार कागदोपत्री पूर्तता करुन घेणेची आहे. |
| ४ | स्पेशल क्लिन लोन लिक्विडीटीसाठी | -- | -- | १३.५० | बँकींग रेग्युलेशन ॲक्ट कलम २४ नुसार तरती जिंदगी पुरेशी ठेवू शकत नसेल तर खास बाब म्हणून तात्पुरत्या कालासाठी याप्रकारचे कर्ज मंजूर करणेत येते. ही व्यवस्था केवळ लिक्विडीटीसाठी असलेने नागरी बँकेने |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | (ताळेबंद कोड नं.२५०२) | | | | त्यांची संपूर्ण गुंतवणूक जिल्हा बँकेत मुदत ठेवीत केली पाहिजे. असे कर्ज मंजूर केलेनंतर नागरी बँकेने आपल्या कर्ज वितरणांवर नियंत्रण आणून तो मर्यादित केला पाहिजे. असे कर्ज मंजूर करताना ते जास्तीत जास्त संस्थेचे स्वभांडवलाइतपत मंजूर केले जाते. |
| ५ | मुदतठेव पावत्यांचे तारणांवर कॅश क्रेडिट ओव्हर ड्रॉफ्ट | १५.०० | -- | ठेव पावतीचे व्याजदरा पेक्षा १.०० टक्के जादा | ठेव पावतीच्या रक्कमेच्या ८५ टक्के पर्यंत कॅश क्रेडिट अगर ओव्हरड्रॉफ्ट मर्यादा मंजूर करणेत येईल. ठेव पावती डिसचार्ज करुन घेवून ताब्यात घेतली जाईल. संबंधित मुदत ठेवीच्या तारणावर इतर कोणत्याही प्रकारचे कर्ज दिले जाणार नाही. |
| ६ | सरकारी व मान्य ट्रस्टी सिक्युरिटीजचे तारणावर कॅश क्रेडिट ओव्हर ड्रॉफ्ट | ४०.०० | -- | १४.०० | याप्रकारचे सिक्युरिटीजचे तारणावर किंमतीचे ८० % कर्जमर्यादा मंजूर करणेत येईल. नागरी बँकांनी स्वत: गुंतविलेल्या रक्कमेपोटीचे हे सिक्युरिटीज असले पाहिजेत व ते जिल्हा बँकेचे नांवे बेचन करुन दिले पाहिजेत. तशी नोंद इश्यु करणाऱ्या (सिक्युरिटीज) ऑफिसने घेतली पाहिजे. तारण दिलेल्या लिक्विडीटी गुंतवणूक सिक्युरिटीज बाँडची रक्कम लिक्वीडीटी गुंतवणूक म्हणून दाखविता येणार नाही. |

(व्याजदर प्रचलित धोरणानुसार राहील.)